# जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालय, बीड. जिल्हा बीड यांचे कार्यालय

## दरपत्रक सुचना

खाजगी मालवाहतूक करणाऱ्या कंत्राटदारांना/कंपनी धारकांना याद्वारे सुचित करण्यात येते की बीड जिल्हा अंतर्गत व आवश्यकता भासल्यास अथवा राज्याबाहेरुन लागणारे द्रवनत्र व वीर्यमात्रा जिल्हयातील 161 पशुवैदयकीय संस्थांना पुरवठयासाठी द्रवनत्र पात्रांचे वाहतुकीकरीता दिनांक 01 ऑक्टोंबर 2025 ते 30 सप्टेंबर 2026 या कालावधीमध्ये अंदाजे 2 ते 3 मे.टन/ 40 ते 48 द्रवनत्र पात्रे वाहतुक क्षमता असलेल्या (मिनी ट्रक/वाहन 407/Eicher) वाहनाचे नोंदणीकृत वाहतुक कंत्राटदारांकडुन प्रति किलोमीटर दराकरीता दरपत्रके मागविण्यात येत आहेत. द्रवनत्र वाहतुक दरकरार संबंधी संपुर्ण सुचना, नियम व अटी जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, बीड येथे सुचना फलकावर कार्यालयीन वेळेत व बीड जिल्हयाचे संकेतस्थळ **https://beed.gov.in** तसेच पशुसंवर्धन विभागाचे अधिकृत संकेतस्थळ **https://ahd.maharashtra.gov.in** दिनांक 29 सप्टेंबर 2025 पासुन पाहावयास उपलब्ध असतील.

### द्रवनत्र व वीर्यमात्रा वाहतुकी करीता

| अ.क्र. | जिल्हा अंतर्गत व जिल्हा बाहेर व परप्रांतात सुध्दा | वाहनाची क्षमता | दरमहा होणारे अंदाजे अंतर कि.मी. | एका वर्षात होणारी वाहतुक अंदाजे अंतर कि.मी. | सध्याचा दर प्रती कि.मी.रुपये सर्व करांसह | एका वर्षात होणारी अंदाजे मुल्य रुपये | पुरवठा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मिनी ट्रक/ वाहन 407/ Eicher/ भाड्याने घेणे | अंदाजे 2 ते 3 मे.टन/40 ते 48 द्रवनत्र पात्रे | 1500 ते 2400 | 26,000 | 27.40 | 6,87,288/- | 01 ऑक्टोंबर 2025 ते 30 सप्टेंबर 2026 |

### दरपत्रक सादर करण्यासंबंधीचे वेळापत्रक

| | | | |
|---|---|---|---|
| १ | दरपत्रक सुचना प्रसिध्दी दिनांक | 29/09/2025 | सकाळी 11.00 वाजता |
| २ | दरपत्रक सादर करण्याचा कालावधी दिनांक | 30/09/2025 ते 07/10/2025 | कार्यालयीन वेळेत (सकाळी 11.00 ते सायं. 17.00 वा) |
| ३ | दरपत्रक समितीसमोर दरपत्रके उघडण्याचा दिनांक | 08/10/2025 | सकाळी 11.00 वाजता |
| ४ | दरपत्रक सादर करण्याचे ठिकाण | जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय कार्यालय, बीड | |
| ५ | दरपत्रक उघडण्याचे ठिकाण | जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय कार्यालय, बीड | |

(डॉ. आर. डी. कदम)
**जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय**
**बीड**

# जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय कार्यालय, जिल्हा बीड यांचे कार्यालय

## दरपत्रके सादर करण्याची पध्दत

1. दरपत्रके सादर करण्यासाठी लागणारे कोरे प्रपत्र, नियम अटी व शर्ती बाबतचा तपशिल, दरपत्रक सुचना प्रसिध्द झाल्यापासुन दिनांक 30/09/2025 ते 07/10/2025 पर्यंत जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालय बीड यांच्या कार्यालयात सकाळी 11.00 वा. ते सायं.17.00 वाजेपर्यंत (सुटटीचा दिवस सोडुन) रुपये 1000/- (अक्षरी-एक हजार रुपये) ना परतावा रक्कम भरली असता मिळू शकते. (नगदी अथवा डिमांड ड्राफट च्या स्वरुपात)

2. दरपत्रक प्रपत्र भरुन देताना रुपये 5000/- (अक्षरी- पाच हजार रुपये फक्त ) चा राष्ट्रीयकृत बँकेचा किंवा इतर बँकेचा डिमांड ड्राफट, जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, बीड यांच्या नावाने जोडणे आवश्यक आहे.

3.शेवटचे दरपत्रक दिनांक 07/10/2025 रोजी सायंकाळी 17.00 वाजेपर्यंत स्विकारण्यात येईल.

4. दिनांक 08/10/2025 रोजी सकाळी 11.00 वाजता **जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय कार्यालय, बीड** येथे समिती समोर दरपत्रके उघडण्यात येतील.

5. ज्या वाहतुक कंत्राटदाराची दरपत्रके मंजुर होतील त्यांना दर करार करतेवळी सुरक्षा ठेव रु. 20,000/- राष्ट्रीयकृत बँकेच्या एफडीआर द्वारे जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,बीड यांच नावे ठेवावे लागतील.

6. मंजुर कंत्राटदारानी रु. 100/- च्या बॉन्डवर विहित करारनामा नोटरी करुन दयावा लागेल.

## द्वि लिफाफा दरपत्रके सादर करण्याची पध्दत

### लिफाफा क्र.1 (तांत्रिक लिफाफा)

### लिपाफा क्र.1 मध्ये खालील कागदपत्रांचा समावेश करण्यात यावा.

1. विहित प्रपत्र.

2. "द्रवनत्र वाहतुक दरकरार सन 2025-2026 साठी नियम व अटी" मी वाचले असुन मला त्या मान्य असल्याबाबत स्वाक्षरी करुन लिफाफयात टाकणे आवश्यक आहे.

3. विहित प्रपत्र **जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय**, बीड यांच्याकडुन खरेदी केल्याची पावती (रु. 1000 ची)

4. रु. 5000/- चा डिमांड ड्राफट (**जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय** बीड यांच्या नावाने)

5. वाहतुक कंत्राटदार यांचा बँकेचा तपशिल.

बँकेचे नांव :

बँक खाते क्रमांक :

शाखचे नांव :

खात्याचा प्रकार : (Saving/Current)

आयएफएससी कोड :

जिल्हा पशुसंवर्धन उप आयुक्त
बीड.

स्वतंत्रपणे संगणीकृत करुन त्यावर स्वाक्षरी करुन लिफाफयात टाकणे आवश्यक आहे.

6. संस्था नोंदणीकृत असल्यास त्याचे प्रमाणपत्र.

7. वाहतुक कंत्राटदार धारकाचे पॅनकार्ड

8. वाहतुक कंत्राटदार धारकाचे आधारकार्ड

9. जीएसटी रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (नोंदणी प्रमाणपत्र) .(असल्यास)

11. **वाहनासंबंधी कागदपत्रे.**

(अ.) वाहनाचा प्रकार व क्षमता या बाबतचे कागदपत्रे.

(ब.) वाहन नोंदणी प्रमाणपत्र (आर सी बुकची प्रत)

(क.) सर्टिफिकेट ऑफ फिटनेस (फॉर्म नं 38)

(ड.) गुडस कॅरेज परमिट.

(इ.) पीयुसी प्रमाणपत्र.

(ई.) Road Tax (रस्ते कर) भरल्याचा पुरावा/पावती

(उ.) वाहनाचा पुर्ण अदयावत विमा

(ऊ) मोटार ड्रायव्हिंग लायसन्स (चालकाचे)

टिप : 1. दरपत्रके सादर करताना अधिकृत लेटर हेड वर सादर करावीत.

2. दोनही लिफाफे वेगवेगळे सिलबंद करुन सादर करावेत.

3. पहिला लिफाफा व दुसरा लिफाफा पाकिटावर **"द्रवनत्र/वीर्यमात्रा वाहुतकीसाठी दरपत्रके सादर करणे (2025-2026)"** असे लिहावे.

(डॉ. आर. डी. कदम)
**जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय**
**बीड**

## द्रवनत्र/वीर्यमात्रा वाहुतकीसाठी दरपत्रके सादर करणे (2025-2026)

### लिफाफा क्र.2 (व्यापारी / आर्थिक लिफाफा )

सदर लिफाफयामध्ये वाहतुक कंत्राटदाराने आपल्याकडील अपेक्षित दर नमुद करण्यात यावेत.

| अ.क्र. | वाहतुकीचा तपशिल | वाहनाचा प्रकार | दर कि.मी (GST व इतर सर्व करारासह) |
|---|---|---|---|
| 1 | द्रवनत्र व वीर्यमात्राची वाहतुक करणे | | |

टिप : 1. दरपत्रके सादर करताना अधिकृत लेटर हेड वर सादर करावीत.

2. दोनही लिफाफे वेगवेगळे सिलबंद करुन सादर करावेत.

3. पहिला लिफाफा व दुसरा लिफाफा पाकिटावर **“द्रवनत्र/वीर्यमात्रा वाहुतकीसाठी दरपत्रके सादर करणे** (2025-2026)**”** असे लिहावे.

4. व्यापारी लिफाफया मध्ये दर हे अक्षरी व अंकी दोन्ही स्वरूपात लिहीणे आवश्यक आहे.

5. नमुद केलेले दर दरपत्रके समीतीस न समजल्यास संबंतधिताचा व्यापारी लिफाफा रदद करण्यात येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

. **दिनांक :**

**वाहतुक कंत्राटदाराची सही**

**नांव :**

**संपुर्ण पत्ता :**

जिल्हा पशुसंवर्धन उप आयुक्त
बीड.

# दरपत्रकासोबत सादर करावयाचे विहित प्रपत्र

| | |
|---|---|
| १. सुचना पत्र संदर्भ क्र. : | द्रवनत्र वाहतुक दरपत्रके / 2025-2026 |
| २.सुचना पत्र क्रमांक : | 2025-2026/जिउपस बीड/द्रवनत्र वाहतुक दरपत्रके/03 |
| ३.सुचना पत्र शिर्षक : | वाहनाने द्रवनत्र वाहतुक करणे |
| ४. वाहन कंत्राटदाराचे नांव : | ---------------------------------------------------------------------------------- |
| ५. संपुर्ण पत्ता : | ---------------------------------------------------------------------------------- |
| | ---------------------------------------------------------------------------------- |
| ६. कंपनी असल्यास स्थापना दिनांक : | ---------------------------------------------------------------------------------- |
| ७. ई-मेल आयडी : | ---------------------------------------------------------------------------------- |
| ९. पॅन क्रमांक : | ---------------------------------------------------------------------------------- |
| १०.आधार क्रमांक : | ---------------------------------------------------------------------------------- |
| ११. जीएसटी क्रमांक .(असल्यास) | ---------------------------------------------------------------------------------- |
| १२.वाहन कंत्राटदाराचे बँकेचे नांव : | ---------------------------------------------------------------------------------- |
| अ.बँक खाते क्रमांक : | ---------------------------------------------------------------------------------- |
| ब.शाखेचे नांव : | ---------------------------------------------------------------------------------- |
| क.खात्याचा प्रकार : | ---------------------------------------------------------------------------------- |
| ड.आयएफएससी कोड : | ---------------------------------------------------------------------------------- |
| १३. डिमांड ड्राफट क्रमांक : | ---------------------------------------------------------------------------------- |
| १४. डिमांड ड्राफट ची रक्कम : | ---------------------------------------------------------------------------------- |
| १५.डिमांड ड्राफट काढलेल्या बँकेचे नांव : | ---------------------------------------------------------------------------------- |
| १६.वाहनाचा प्रकार : | ---------------------------------------------------------------------------------- |
| १७. वाहनाचा क्रमांक : | ---------------------------------------------------------------------------------- |
| १८. वाहनाचे चटाई क्षेत्र : | ---------------------------------------------------------------------------------- |

**दिनांक :**

**वाहतुक कंत्राटदाराची सही**

**नांव :**

**संपुर्ण पत्ता :**

जिल्हा पशुसंवर्धन उप आयुक्त
बीड.

# जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय बीड

## द्रवनत्र वाहतूक दर करार सन 2025-2026 साठी नियम व अटी

1) द्रवनत्र वाहतुक दरकरार संबंधी संपूर्ण सूचना, नियम व अटी *जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय बीड* येथे सूचना फलकावर कार्यालयीन वेळेत व बीड जिल्हयाचे संकेतस्थळ http://beed.gov.in तसेच पशुसंवर्धन विभागाचे अधिकृत संकेतस्थळ https://ahd.maharashtra.gov.in वर दिनांक 24/09/2025 पासून पहावयास उपलब्ध असतील.
2) वाहतूक कंत्राट दाराने द्रवनत्र दर करारा-सबंधीचे विहित प्रपत्र, नियम व अटी व दरपत्रके सूचना पत्रक या कार्यालयाकडून प्राप्त करुन घेणे अनिवार्य आहे.
3) वाहतुक कंत्राटदाराने आपले दर प्रति कि.मी. प्रमाणेच द्यावेत. प्रती कि.मी. दर हे जी.एस.टी. व इतर सर्व करांसह नमूद करावेत. पुरवठा कालावधीत मुक्कामाचे स्वतंत्र दर दिले जाणार नाहीत.
4) वाहतुक करताना वाहतूक प्रवास हा सर्वात जवळच्या मार्गाने केला जाईल याची नोंद घ्यावी.
5) दर नमुद करताना वाहनाचे चटईक्षेत्र, वाहनाचा प्रकार स्पष्टपणे लिहावा. तसेच TA-55/TA-50 ची कमीत कमी 40 द्रवनत्रपात्रे व जास्तीत जास्त 48 द्रवनत्रपात्रे बसण्याची क्षमता असावी तसेच वाहनाची क्षमता (Loading Capicity) 2 टन ते 3 टन असावी.
6) दर निश्चित करीत असताना जर दोन किंवा तीन कंत्राटदाराचे दर सारखे आले तर वाहनाचा प्रकार, उपलब्ध चटईक्षेत्र पाहून समिती अंतिम निर्णय घेईल व तो निर्णय सर्वांना बंधनकारक राहील.
7) वाहनामध्ये दोन मजल्याची व्यवस्था करावी, जेणे करुन त्याचा उपयोग आवश्यकते नुसार द्रवनत्र वाहतुकीसाठी करता येईल.
8) वाहन बंद बॉडीचे व ताडपत्रीने आच्छादन असलेले असावे व द्रवनत्र पात्र वाहतुकीचे वेळी गाडीमध्ये 1.5 ते 2 से.मी. जाडीचे रबर मॅटींग टाकणे आवश्यक आहे. रबर मॅटींग टाकणे अनिवार्य आहे. वाहन सुस्थितीत असावे, ही व्यवस्था नसल्यास प्रत्येक फेरीत निविदाधारकास रु. 1000/- दंड आकारण्यात येईल व हा दंड त्याचा देयकातून वसूल केला जाईल.
9) वाहनाचा दुरुस्ती खर्च, कर, इंधन, ऑईल, ग्रीस इत्यादीचा खर्च कंत्राटदाराने करावा. वाहतुकीसाठी वाहन दुरुस्तीसाठी अग्रीम मिळणार नाही. वाहतुक भाडे उपलब्ध आर्थिक तरतुदीनूसार अदा करण्यात येईल.
10) कंत्राट कालावधीत इंधनाचे दर वाढल्यास वाढीव दराप्रमाणे वाहतूकीचे पैसे मिळणार नाहीत. मंजूर दराप्रमाणेच वाहतूक करावी लागेल.
11) वाहतुकीच्या वेळी या कार्यालयाचे एक प्रतिनिधी, आणि वाहतूक कंत्राटदाराचा एक मदतनीस सोबत राहतील. तसा वाहनाचा परवाना असावा. द्रवनत्रपात्र चढविणे, उतरविणे व त्याच्या वाहतुकीसाठी कंत्राटदाराच्या प्रतिनिधीने मदत करावी लागेल. त्यासाठी वेगळा आकार (हमाली) दिला जाणार नाही.

जिल्हा पशुसंवर्धन उप आयुक्त
बीड.

12) द्रवनत्र पुरवठादार यांचे कडुन ज्यावेळी जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, बीड येथे द्रवनत्र पुरवठा केला जाईल त्यावेळी वाहतुक कंत्राटदाराने त्यांचा एक मदतनीस द्रवनत्र भरून घेण्यासाठी उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील.

13) कंत्राटदारास द्रवनत्र वाहतूक / पूरवठा करण्यासाठी वाहनाची व्यवस्था पशुधन विकास अधिकारी, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, बीड किंवा त्यांचे प्रतिनिधीने दिलेल्या कार्यक्रमानुसार करावी लागेल. नियोजित वेळेत कंत्राटदाराने वाहन उपलब्ध केले नाही तर बाजारातून प्रचलित दराने दुसरे वाहन वापरले जाईल व जादा फरकाची रक्कम कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल.

14) दरपत्रक उघडण्याच्या वेळी वाहतूक कंत्राट दाराने प्रत्यक्ष पाहणीसाठी वाहन जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, बीड येथे उपलब्ध ठेवावे. सोबत वाहनाची सर्व मूळ कागदपत्रे आणणे बंधनकारक आहे. दरपत्रक भरणाऱ्याच्या /वाहतूक कंत्राटदाराच्या स्वत: च्या मालकीचे वाहन असणे आवश्यक आहे.

15) तांत्रिक लिफाफा (लिफाफा क्र.1) मध्ये वाहन व व्यवसाया संबंधीची खालील कागदपत्राच्या सत्यप्रती किंवा छायांकित (झेरॉक्स्) प्रती स्वसाक्षांकित करुन टाकणे आवश्यक आहे आणि मुळ प्रती दरपत्रक उघडण्याच्या वेळी दरपत्रक समीती समोर खात्री करण्यासाठी सोबत आणणे बंधनकारक आहे.

1) गाडीची आर.सी. बुकची प्रत (वाहन नोंदणी पुस्तकाची प्रत), 2) वाहनाचा पुर्ण अद्यावत विमा, 3) पी.यु.सी. प्रमाणपत्र 4) सर्टिफिकेट ऑफ फिटनेस (फार्म नं. 38), 5) गुडस कॅरेज परमिट, 6) मोटार ड्रायव्हिंग लायसन्स (चालकाचे), 7) पॅन कार्ड (मालकाचे), 8) आयकर रिटर्न फॉर्म (मागील तीन वर्षाचे), 9) आधार कार्ड (मालकाचे), 10) जी.एस.टी. रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट (नोंदणी प्रमाणपत्र), 11) अनुभव प्रमाणपत्र, 12) Road Tax (रस्ते कर) भरल्याचा पुरावा / पावती, 13) वाहनांचा प्रकार व 40 ते 48 कंटेनर वाहतूकीची क्षमता असल्याचे प्रमाणपत्र,

16) द्रवनत्र वाहतूकी दरम्यान द्रवनत्रपात्रांच्या सुरक्षिततेची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. वाहतूकीच्या काळात शासनाच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास त्याची संपुर्ण भरपाई करुन देण्यास कंत्राटदार जबाबदार राहील.

17) कंत्राटदारास द्रवनत्र पूरवठा आखून दिलेल्या कार्यक्रमानुसारच करावा लागेल. दिरंगाईमुळे शासनास सोसाव्या लागणाऱ्या नुकसानीची जबाबदारी कंत्राटदारावर राहील व दंडात्मक कार्यवाहीस तो पात्र राहील/असेल.

18) कंत्राटदाराने द्रवनत्र वाहतुकीच्या वेळी इतर खाजगी मालाची अथवा प्रवाशांची वाहतूक करु नये. तसे केल्यास नियमाप्रमाणे दंड आकारण्यात येईल किवा आर.टी.ओ. यांनी वाहन पकडल्यास त्यास कंत्राटदार सर्वस्वी जवाबदार राहतील.

19) कंत्राटदाराने समाधानकारक वाहतूक न केल्यास त्यांचे कंत्राट रद्द करण्याचे अधिकार जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय बीड यांचेकडे राहतील तसेच त्यांची अनामत रक्कम व सुरक्षा ठेव शासन जमा करण्यात येईल.

जिल्हा पशुसंवर्धन उप आयुक्त
बीड.

20) एकापेक्षा अधिक वाहने एकाच वेळी या कार्यालयाकरिता तसेच या कार्यालयातंर्गत इतर संस्थेस वाहन लागल्यास मान्य केलेल्या दराने वाहन उपलब्ध् करुन देणे बंधनकारक राहील. अशा वेळी मुख्य ठेकेदारा व्यतिरिक्त दुसऱ्याचे वाहन असु शकतील मात्र वाहतुकीची जबाबदारी ही मुख्य ठेकेदाराची राहील.

21) द्रवनत्र वायू हा अतिशय थंड असतो त्यामुळे वातावरणाशी संबंध येताना त्या पासून जी वाफ निघते ती पण थंड असते. हा वायु स्फोटक नाही याची माहिती ठेकेदारांनी पुर्णपणे करुन घ्यावी.

22) वाहतूक कंत्राटदाराचा ठेका मंजूर झाल्यास, परंतु नियमाप्रमाणे काम न केल्यास, दुसरा ठेका जादा दराने मंजूर करावा लागल्यास मुळ ठेकेदाराच्या सुरक्षा ठेव/ बिलाच्या रक्कमेतून फरकाची रक्कम वसूल करण्यात येईल.

23) तांत्रिक लिफाफ्यामधील सर्व कागदपत्राची पुर्तता व पडताळणी अंती योग्य असणाऱ्या वाहतूक कंत्राटदाराचा व्यवसायिक लिफाफा उघडण्यात येईल.

24) ज्या कंत्राटदाराचे दरपत्रक मंजूर होईल त्या कंत्राटदारास दरपत्रक मंजूर झाल्यापासून 10 दिवसाच्या आत रुपये 20,000/- (अक्षरी वीस हजार रुपये फक्त) रक्कम सुरक्षा ठेव (Security Deposite) म्हणून राष्ट्रीयकृत बँकेच्या एफ.डी.आर. व्दारे जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, बीड यांचे नांवे ठेवावे लागतील. तसेच रुपये 100/- च्या बॉन्डवर विहित करारनामा नोटरी करुन द्यावा लागेल.

25) कंत्राटदाराने वाहतुकीच्या वाहनाचा सरसकट अद्यावत विमा काढलेला असावा.

26) वाहनाचा वेग ताशी 40 कि.मी. पेक्षा जास्त नसावा, तसेच मद्यपान करुन चालक वाहन चालवित असल्यास किंवा अनावश्यक वाहनाचा वेग मर्यादेचे उल्लंघन केल्यास तसेच मद्यपानाच्या कायदेशिर कार्यवाहीस कंत्राटदारास सामोरे जावे लागेल, त्यामुळे शासकिय संपत्तीचे नुकसान झाल्यास ठेकेदारास नुकसान भरपाई द्यावी लागेल.

27) दरपत्रक समिती समोर स्वत: वाहतूक कंत्राट दाराने वेळीच आक्षेप घेतल्यास त्यावर विचार करता येईल परंतु दरपत्रक समिती समोर कोणताही आक्षेप न घेता जर एखादे न्यायालयीन प्रकरण उदभवले तर वाहतूक कंत्राटदारावर संबंधित प्रकरणाची जबाबदारी राहील. ज्या वाहतूक कंत्राट दारास न्यायालयात जायचे आहे किंवा तक्रार करावयाची आहे त्यांनी अंतिम निर्णय होईपर्यंत त्यांचे कॉल डिपॉझीट कार्यालयाचे ताब्यात राहील. कॉल डिपॉझीट परत घेतल्यास वाहतूक कंत्राट दाराची कोणतीही तक्रार नाही असे समजण्यात येईल.

28) ज्या वाहतूक कंत्राटदाराचा क्रमांक दुसरा राहील त्याची अनामत रक्कम एक महिन्यानंतर परत करण्यात येईल. इतरांची अनामत रक्कम त्वरित परत करण्यात येईल. क्रंमाक (1) ने ठेका नाकारल्यास त्याचे कॉल डिपॉझीट जप्त करण्यात येईल व दुसरा क्रंमाकाच्या दरपत्रकास मान्यता देण्यात येईल.

29) जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, बीड यांनी ठरविलेल्या कार्यक्रमानूसार व मागणीप्रमाणे सर्व द्दष्टीने सुस्थितीत असलेले वाहन उपलब्ध करुन न दिल्यास संबंधित वाहतुकी करिता बाहेरील दुसरे वाहन कोणतेही उपलब्ध दराने मिळविण्यात येईल व त्याकरिता लागणारे जास्तीचे भाडे वाहतुक ठेकेदारांच्या देयकातून वसूल करण्यात येईल.

जिल्हा पशुसंवर्धन उप आयुक्त
बीड.

30) वाहन उपलब्ध करुन देण्या बाबत सर्वसाधारण 12 तासापुर्वी सुचना देण्यात येईल, आकस्मिक परिस्थितीत वेळेवर वाहन बोलावण्यात येईल. पुर्व सुचना देऊनही वाहन उपलब्ध करुन देण्यास वाहतूक कंत्राटदार टाळाटाळ करत आहे असे आढळून आल्यास वाहन धारकास प्रत्येक वेळी कमीत कमी रुपये 1000/- व जास्तीत जास्त रुपये 5000/- दंड आकारण्यात येईल व तो दंड त्याच्या देयकातून वसूल केला जाईल.

31) दरपत्रक मंजूर झालेल्या ठेकेदारास नियमानुसार आयकर अनुज्ञेय राहील व तो आयकर बिलातून कपात करण्यात येईल.

32) दरपत्रक स्विकारणे, मंजूर करणे किंवा रद्द करणे इत्यादी बाबतचे सर्व अधिकार दरपत्रक समितीस राहतील व दरपत्रक समितीचा निर्णय ठेकेदारास बंधनकारक राहील.

33) उपलब्ध ठिकाणावरुन द्रवनत्र आणताना वाहनास लागणारा पथकर, जकात तसेच इतर राज्यात जाताना लागणारा कर वाहतुक दारास भरणे बंधनकारक राहील.

34) पुढील नवीन वर्षाचे दरपत्रक मान्य होईपर्यंतच्या काळात याच मान्य दराने ठेकेदारास वाहतूक करावी लागेल. दर करार कालावधी मध्ये शासकीय वाहन उपलब्ध झाल्यास झालेला करार त्याच दिवशी संपुष्टात येईल.

35) वाहतुकीच्या एकूण अंतराचे (किलोमीटर मध्ये) बिल जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, बीड येथून धरण्यात येईल. मार्गातील सरासरी अंतर (किलोमीटर मध्ये) पशुधन विकास अधिकारी, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, बीड हे ठरवतील व त्याप्रमाणे बिलाची रक्कम देण्यात येईल.

36) द्रवनत्र वाहतुकीसाठी दिलेल्या मार्गावरी असलेल्या पवैद संस्थे मध्येच रात्रीचा मुक्काम करावा लागेल, इतर ठिकाणी खाजगी व्यक्तीच्या/खाजगी संस्थेच्या ठिकाणी मुक्काम करता येणार नाही, तसेच द्रवनत्र पुरवठादाराकडे वाहन मुक्कामी थांबल्यास मुक्कामाचे दर स्वतंत्रपणे दिले जाणार नाहीत. असे केल्याचे निर्दशनास आल्यास व शासनाचे नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही वाहतुक कंत्राटदाराची राहील.

37) ज्या वाहना साठी दर करार मंजूर झाला आहे. त्याच क्रंमाकाचे वाहन कंत्राटदारास द्रवनत्र पुरवठा करते वेळी वापरणे बंधनकारक राहील. अन्यथा कार्यवाहीस पात्र असेल.

38) दरपत्रक मंजूर झालेल्या कालावधी मध्ये पशुधन विकास अधिकारी, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, बीड, यांच्या मागणी प्रमाणे कंत्राटदारांनी नियोजित वेळेमध्ये वाहन उपलब्ध् करुन द्यावे. कोणत्याही उत्सवाचे / सणांचे / धार्मिक कारणामुळे कंत्राटदारांनी द्रवनत्र वाहतूक करताना चालढकल करु नये अन्यथा नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

39) दरपत्रक मंजूर झालेल्या वाहनाचे किलो मीटर दर्शविणारे मिटर चालू सुस्थितीत असावे.

40) कंत्राटदारांने जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र लिफाफा मध्ये सोबत जोडणे आवश्यक आहे.

41) शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अटी नुसार जी.एस.टी. (सेवाकर) देयकातून कपात केला जाईल.

42) कोणत्याही कारणास्तव वाहतुकीचा संप झाल्यास त्याकरिता या कार्यालयाच्या कार्यक्रमाच्या पत्रासह वाहतूक कंत्राट दाराने पोलिस संरक्षण उपलब्ध करुन घेणे आणि द्रवनत्र वाहतुक सुरळीत करुन घेणे ही जबाबदारी ठेकेदाराची राहील, कारण या सेवा अत्यावश्यक आहेत.

जिल्हा पशुसंवर्धन उप आयुक्त
बीड.

43) प्रत्येक वाहतूकीच्या वेळी द्रवनत्र पात्रे वाहन चालकाच्या ताब्यात देण्यात येतील व ती व्यवस्थित ठेवण्याची जबाबदारी वाहन चालकाची राहील. वाहतुकीच्या वेळी द्रवनत्र पात्रे हाताळतांना निष्काळजीपणामुळे द्रवनत्र पात्राचे नुकसान झाल्यास त्याची किंमत वाहतुक ठेकेदारांकडून वसूल करण्यात येईल.

44) प्रवासाच्या कालावधीत खाजगी नाक्यावरील टोलटॅक्स्, ग्रामपंचायत/ नगरपालिका/ महानगरपालिका कर, रहदारी कर, वाहतुक ठेकेदारास भरावे लागेल.

45) दरकरार निश्चित झाल्यानंतर वाहतुक करावयाच्या वाहनाच्या आतील सर्व शासकिय साहित्याचा विमा वाहतुकदारांने काढणे बंधनकारक राहील.

46) वाहतुक करीत असताना संबंधित वाहनात ठेकेदाराच्या अधिकृत प्रतिनिधी शिवाय कोणतेही प्रवासी किंवा प्रवासी सामान घेऊ नये, असे आढळल्यास कमीत कमी रु. 1000/- जास्तीत जास्त रु. 5000/- दंड आकारण्यात येईल.

47) जिल्हा अंतर्गत वाहतुक करताना जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, बीड यांच्या आदेशानुसार ठरवून दिलेल्या मार्गानेच वाहतूक करावी लागेल या संबंधी वाद किंवा तक्रारीचे निराकरण करण्याचे अंतिम अधिकार कार्यालय प्रमुख यांना राहतील.

48) सदर प्रक्रियेमध्ये भाग घेणाऱ्या वाहतुक कंत्राटदाराने मागील आर्थिक वर्षातील शासनाचे सर्व प्रकारचे कर भरलेले असावे व भरलेल्या प्रती सोबत जोडव्यात. शासनाची करा संबंधी कोणतीही थकबाकी नसावी.

49) वाहतुक करीत असताना कोणत्याही वाहन परिवहन नियमाविषयक नियमांच किंवा पोलिस कायदयानूसार नियमांचे उल्लंघन झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदारावर राहील व वाहन जप्त व किंवा इतर कार्यवाहीसाठी खोंळबून ठेवल्यास वाहतुकीसाठी दुसरे पर्यायी वाहन उपलब्ध करुन त्यामध्ये द्रवनत्र पात्राची वाहतूक करुन द्यावी लागेल.

50) द्रवनत्र वितरणाच्या वेळी प्रत्येक उपकेंद्रावर थोडा वेळ थांबून, द्रवनत्र देऊन, रिकामे द्रवनत्र पात्र वाहनात घेऊन पुढच्या केंद्रावर जावे लागेल.

51) द्रवनत्र/ विर्यमात्रा आणण्यासाठी एखाद्या ठिकाणी वाहन गेले असेल तेथे द्रवनत्र/ विर्यमात्रा ताबडतोब उपलब्ध नसेल तर ते उपलब्ध होई पर्यंत वाहन तेथेच थांबवावे लागेल त्या बाबतची अतिरिक्त रक्कम मिळणार नाही.

52) ज्यांचे दर सर्वात कमी असतील त्यांचे दरपत्रक मंजूर करणे हे निवड समितीवर बंधनकारक राहणार नाही, निवड समीती जो निर्णय घेईल तो निर्णय अंतिम राहील व त्यास कोणताही आक्षेप घेता येणार नाही.

53) वाहनावर "महाराष्ट्र शासन सेवार्थ" हा बोर्ड फक्त द्रवनत्र वाहतुक करताना किंवा शासकीय मालवाहतुक करतानाच वापर करता येईल, इतर वेळी वाहनावर सदरील बोर्ड लावु नये. जर असे केल्यास व काही प्रसंग घडल्यास त्याची सर्वेस्वी जबाबदारी ही वातुक कंत्राटदाराची राहील.

54) द्रवनत्र वाहतुकीसाठी दिलेल्या मार्गावरील सर्व संस्थांना द्रवनत्र पुरवठा करावा लागेल. काही प्रसंगी पावसाळयामध्ये एखादया रस्त्याने वाहन जात नसल्यास पर्यायी मार्गाने संस्थेस द्रवनत्र पुरवठा करणे बंधनकारक राहील.

जिल्हा पशुसंवर्धन उप आयुक्त
बीड.

55) द्रवनत्र वाहतुक करतांना वाहनातील द्रवनत्र खाजगी लोकांना/खाजगी संस्थांना/खाजगी दुकानदारांना दिल्याचे निर्दशनास आल्यास वाहतुक कंत्राटदारावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल व याची सर्व जबाबदारी ही वाहतुक कंत्राटदाराची राहील.

56) वाहतुक कंत्राटदारास करभरणा, वाहनाचा दुरूस्तीखर्च, इंधन, ऑईल, ग्रीस, इत्यादी चा खर्च भागविण्यासाठी कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांच्याकडुन उसनवारी तत्वावर पैसे दिले जाणार नाहीत.

57) वाहन वाहतुकीच्या सेवेत असताना वाहनाचे हालचाल, वाहनासोबत असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या आदेश प्रमाणे करावे लागेल व तसेच वाहन चालक यांची वर्तणूक चांगली असावी. दारू पिऊन वाहन चालवू नये, तसे केल्यास मंजूर करार खंडित करण्याचे अधिकार जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त बीड यांना राहतील.

58) द्रवनत्र वाहतुकीच्या मार्गावर कृत्रिम रेतन उपकेंद्राचे शासकीय सामान असेल तर ते विनामूल्य वाहतूक करावी लागेल व ते त्यांना बंधन कारक राहील.

59) व्यापारी लिफ़ाफ़्यामध्ये दर हे अक्षरी व अंकी दोन्ही स्वरूपात लिहिणे आवश्यक आहे.

60) नमूद केलेली दारपत्रके समितीस न समजल्यास संबंधितांचा व्यापारी लिफाफा रद्द करण्यात येऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

61) वेळोवेळी शासकिय नियमातील काही बदलामुळे जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय बीड यांनी केलेल्या सुचना व अटीचे पालन ठेकेदारांना करावे लागतील.

62) तांत्रिक लिफाफयामध्ये "द्रवनत्र वाहतूक दरकरार सन 2025-2026 साठी नियम व अटी" मी वाचल्या असुन त्या मला मान्य असल्या बाबत स्वाक्षरी करुन टाकणे आवश्यक आहे.

63) या संबंधात सर्व न्यायालयीन दावे बीड न्यायालयाच्या अंतर्गत असतील.

64) शासनाने निर्देशित केलेले सर्व नियम व अटी कंत्राटदारास बंधनकारक राहतील.

65) वरील नियम व अटी शिवाय निवड समिती ऐनवेळी नवीन नियम व अटी घेऊ शकतात किंवा घेतल्यास त्या वाहतूक कंत्राट दारावर बंधनकारक राहतील. एक किंवा सर्वच दरपत्रके कोणतेही कारण न दाखविता नाकारण्याचा अधिकार निवड समितीच्या वतीने जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय बीड यांनी राखून ठेवला आहे.

वरील सर्व नियम व अटी मी वाचल्या असून मला मान्य आहेत. असे लिहून देत आहे.

स्थळ :-
दिनांक :-

(वाहतूक कंत्राट दाराचे स्वाक्षरी)
नांव :-
पत्ता :-
फोन नंबर :-

साक्षीदाराचे नावे व स्वाक्षरी :-

1) --------------------

2) ---------------------

जिल्हा पशुसंवर्धन उप आयुक्त
बीड.